# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/०४/२०२४ (मंगळवार) दुपार**


---

## अवैधरीत्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक

दि. 09/04/24 रोजी पो.स्टे. कन्हान हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असता एक युवक honda activa वाहनाने आंबेडकर चौक येथे संशयीतरीत्या फिरतांना दिसला त्याला थांबवून त्याचे नाव विचारले असता त्याने आपले संजय गुप्ता रा. कन्हान असे सांगितले यावर त्यांची activa ची पाहणी केली असता त्याचे गाडीचे डिक्की मध्ये एक काळया रंगाचे कव्हर मध्ये एक धारधार चाकू मिळून आला चाकू सोबत घेऊन का फिरत आहे विचारले असता उडवाउडवी चे उत्तर देऊ लागला तरी सदर युवक हा कोणतातरी हस्तक्षेपनीय गुन्हा करण्याचे इराद्याने धारदार चाकू घेऊन फिरत असल्याचा दाट संशय आल्याने सदर आरोपी नामे– संजय शामलाल गुप्ता वय 22 रा. हरिहर नगर कन्हाण याचेकडुन एक धारदार चाकू की. 200/–रू., MH 40 CU 1879 की. 50,000/–रू. मुद्देमाल जप्त करून गुन्हयातील सदर आरोपी यांचेवर विरुद्ध कलम 4/25 भाहका .188 भादवी. सहकलम 135 म.पो.का.अन्वये गुन्हा नोंद होणे कामी आरोपी यांची मेडीकल तपासणी करुन जप्ती मुद्देमालासह पोलीस स्टेशन कन्हाण यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, API आशीषसींग ठाकूर, PSI बट्टूलाल पांडे ,ASI नाना राऊत, HC विनोद काळे, ईकबाल शेख, प्रमोद भोयर NPC संजय बरोदीया, चालक मोनू शुक्ला यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर